# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## प्रेस नोट

जा.क्र/दवाखाना विभाग/४५२९/२०२४
दि. ०४/०२/२०२४

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील संकिर्ण आवेदन (Misc Application) क्र. १६९९/२०१९ च्या संदर्भात दिलेल्या निकालातील मार्गदर्शक सुचनांनुसार "Custodian" ह्यांची नियुक्ती करणेकामी कार्यवाही न झाल्यामुळे प्रा. निखील दातार यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरूद्ध जनहित याचिका क्र.३/२०२४ दाखल केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाकडील विषयांकित जनहित याचिकेवरील झालेल्या आदेशानुसार सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी त्यांच्या स्तरावरुन "Custodian" ह्यांची नियुक्ती तात्काळ करुन "Custodian" ह्यांची संपूर्ण माहिती (हुद्दा, पत्ता व मोबाईल क्रमांक/ऑफिस दुरध्वनी क्रमांक) त्यांच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रमाध्यमात प्रसिद्ध करणेबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग क्रमांक आरोग्य-२०२४/प्र.क्र.९३/नवि-२० यांचेकडील दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ चे पत्र अन्वये कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका स्तरावर "Custodian" म्हणून प्रमुख वैद्यकीय अधिकारी **डॉ. राम किशनचंद रावलानी, दवाखाना विभाग कार्यालय, शाहू नगर जळगांव मनपा** यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्यांचा **मोबाईल क्रमांक ९४२३१८९९८८** व दवाखाना विभाग कार्यालयीन दुरध्वनी **क्रमांक ०२५७-२२४१३११** असा असून याची जळगांव महापालिका क्षेत्रातील नागरीकांनी नोंद घ्यावी.

**श्रीमती पल्लवी भागवत (जगंम)**
**अतिरिक्त आयुक्त**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

**प्रति,**
**मा.संपादक**
**दैनिक.....................**
**जळगांव.**

वरील प्रेस नोट ही जळगांव शहरातील जास्तीत जास्त नागरीकांना माहिती व्हावी. याकरीता आपले लोकप्रिय दैनिकातून एक वेळ विनामूल्य बातमी स्वरुपात प्रसिद्ध करुन जळगांव महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**श्रीमती पल्लवी भागवत (जगंम)**
**अतिरिक्त आयुक्त**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

Scanned with OKEN Scanner